


वरुड
# दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा




वरुड | शनिवार | ०५.०९.२०२६

संपादक – चंद्रकांत भा.भड

वर्ष: ०७ | अंक: २१७ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028 +91 7745067712


## थोडक्यात

### ‘पळू शकता, पण लपून राहू शकत नाही!’

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**बुडगाम** – जम्मू–काश्मीरमधील बुडगाम जिल्ह्यात सुरक्षा दलांनी राबवलेल्या एका मोठ्या संयुक्त मोहिमेत ’लष्कर–ए–तय्यबा’ या दहशतवादी संघटनेच्या एका पाकिस्तानी दहशतवाद्याचा खात्मा करण्यात यश आले आहे. ’ऑपरेशन अशदर’ या नावाने चालवण्यात आलेल्या या मोहिमेत ठार झालेल्या या दहशतवाद्याची ओळख ’यासीर’ अशी पटली असून तो मूळचा पाकिस्तानचा नागरिक होता. या कारवाईनंतर सुरक्षा दलांनी सोशल मीडियावर देशविरोधी घटकांना कडक इशारा देत, ‘तुम्ही पळू शकता, पण लपून राहू शकत नाही!‘ असा सणसणीत संदेश दिला आहे.

**अंधारात वळणावर उभ्या असलेल्या ट्रकला भरधाव कारची धडक**

# इंजिनिअरिंगच्या ८ विद्यार्थ्यांचा मृत्यू, दरवाजे कापून काढले मृतदेह

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**त्रिशूर** – केरळच्या त्रिशूरमध्ये शुक्रवारी (दि.४) मध्यरात्री ११.४० च्या सुमारास भीषण अपघात झाला. अंधारात वळणावर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला तामिळनाडूतील इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांची भरधाव कार धडकली. या अपघातात ८ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. धडक इतकी भीषण होती की कारचा चुराडा झाला असून, मृतदेह बाहेर काढण्यासाठी कारचे दरवाजे आणि इतर भाग कापावे लागले.



**केरळमध्ये फिरण्यासाठी आले अन...**

मृतांमध्ये मेकॅनिकल आणि सिव्हिल इंजिनिअरिंगचे विद्यार्थी तसेच त्यांचे मित्र होते. ते केरळमध्ये फिरण्यासाठी आले होते, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. मृतांपैकी सहा जणांची ओळख पटली असून, अन्य दोन जणांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

**धडकेनंतर कारचा चुराडा**

ट्रकला दिलेली धडक इतकी भीषण होती की कारचा अक्षरशः चुराडा झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस आणि अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. चुराडा झालेल्या कारमधून मृतदेह बाहेर काढण्यासाठी वाहनाचे काही भाग कापावे लागले.

**उड्डाणपुलाजवळ झाला अपघात**

राष्ट्रीय महामार्गाच्या ज्या भागात रस्त्याचे बांधकाम सुरू आहे, त्या ठिकाणी उड्डाणपुलालगत हा अपघात झाला. रात्रीच्या वेळी रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकसाठी योग्य इशारा संकेत किंवा पुरेशी प्रकाशव्यवस्था नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# सूर्यकुमार आला, आवाज घुमला अन गोविंदांचा जोश शिगेला!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**ठाणे** – राज्यात आज दहीहंडीचा जल्लोष शिगेला पोहोचला असून, ‘ढाक्कु माकुमः ढाक्कुमाकुमः’च्या तालावर मानवी मनोरे रचत गोविंदा पथके दहीहंडी फोडण्यासाठी सज्ज झाली आहेत.

शहरातील विविध मानाच्या दहीहंड्यांमुळे ठाण्याचा परिसर उत्साहाने आणि जल्लोषाने दुमदुमला आहे. लाखो रुपयांची बक्षिसे, विश्वविक्रमाचे आव्हान आणि सेलिब्रिटींची उपस्थिती यामुळे यंदाचा उत्सव विशेष चर्चेत आहे. गोपाळकाळाच्या निमित्ताने ठाण्यात टेंभी नाका, तलावपाळी, वर्तकनगर, रघुनाथनगर, हिरानंदानी मेडॉस, नौपाडा आणि रेमंड परिसरात मोठ्या दहीहंड्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

**संस्कृती प्रतिष्ठानच्या हंडीत २५ लाखांचे आव्हान**



सकाळपासूनच विविध गोविंदा पथकांची लगबग सुरू असून, ढोल–ताशे आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात वातावरण उत्साहाने भारून गेले आहे.

विशेषतः प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती प्रतिष्ठानच्या वतीने वर्तकनगर येथे आयोजित करण्यात आलेली विश्वविक्रमी दहीहंडी यंदाच्या उत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरली आहे. या दहीहंडीच्या माध्यमातून अभिजात आणि समृद्ध मराठी भाषेचा गौरव करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. विश्वविक्रम मोडणाऱ्या गोविंदा पथकासाठी तब्बल २५ लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. याशिवाय १० थर रचणाऱ्या पथकाला ११ लाख रुपये आणि आकर्षक ट्रॉफी देण्यात येणार आहे.

विविध थरांसाठीही आकर्षक बक्षिसे आणि सन्मानचिन्हांची घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे गोविंदा पथकांमध्ये विक्रम मोडण्याची चुरस पाहायला मिळत आहे.

सूर्यकुमार यादवची एन्ट्री अनब गोविंदांचा उत्साह दुप्पट दरम्यान, भारतीय क्रिकेट संघाचा माजी टी–२० कर्णधार सूर्यकुमार यादव यानेही वर्तकनगर येथील दहीहंडी सोहळ्याला उपस्थिती लावली.

सूर्यकुमारच्या उपस्थितीने गोविंदा आणि उपस्थित प्रेक्षकांचा उत्साह आणखी वाढला. मंचावर येताच सूर्यकुमार यादवने आपल्या खास अंदाजात उपस्थितांना आवाज वाढवण्याचं आवाहन केलं. तो म्हणाला, ङकसं काय ठाणे? आवाज येत नाही तुमचा... जोरात आवाज झाला पाहिजे. यानंतर त्याने आपल्याला निमंत्रित केल्याबद्दल प्रताप सरनाईक यांचे आभार मानले.

# शिक्षक दिनानिमित्त झच मोदींचा शिक्षकांशी मनमोकळा संवाद : ‘स्क्रीन टाईम’ आणि ड्रग्जच्या वाढत्या धोक्यावर व्यक्त केली चिंता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – शिक्षक दिनाचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतील आपल्या निवासस्थानी राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेत्यांशी मनमोकळा संवाद साधला. या वेळी शिक्षण पद्धती, मुलांचे वाढते मोबाईलचे व्यसन, अमली पदार्थांचा धोका आणि मुलांमधील सुप्त गुण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर हलक्या–फुलक्या वातावरणात चर्चा झाली.



**शिक्षकांशी मिश्किल गप्पा आणि हास्यकल्लोळ**

संवादादरम्यान एका शिक्षिकेने सांगितले की, त्या शाळेत मुलांकडून मुलाखती घेण्याचा सराव करून घेतात. यावर पंतप्रधान मोदी हसून म्हणाले, ‘म्हणजे ही मुले घरी जाऊन पालकांचीही मुलाखत घेत असतील! ‘आज हाच स्वयंपाक का केला ? एवढा खर्च का झाला?’ असे प्रश्न विचारून त्यांनी पालकांना त्रस्त केले असेल.’ पंतप्रधानांच्या या विनोदावर सर्वांमध्ये एकच हशा पिकला.

**वक्तृत्व कला आणि आत्मविश्वासाचे धडे**

वक्तृत्व शिकवणाऱ्या एका शिक्षिकेला पंतप्रधानांनी विचारले, ‘जर मी तुमचा विद्यार्थी असतो, तर मला चांगला वक्ता बनण्यासाठी तुम्ही काय सल्ला दिला असता?’ यावर शिक्षिकेने ‘आत्मविश्वास हवा’ असे सांगितले, पण पंतप्रधान समोर असल्यामुळे त्या स्वतःच थोड्या घाबरल्या. यावर मोदींनी मिश्किलपणे विचारले, ‘म्हणजे उत्तम वक्ता बनण्यासाठी वलय नसले पाहिजे का? नाहीतर लोक भाषण ऐकण्याऐवजी फक्त वलयाकडेच पाहत राहतील.’

# रेती चोरांवर पोलिसांचा सर्जिकल स्ट्राईक

**दोन गाड्यांसह ४० लाखांचा मुद्देमाल जप्त**

**सरकारी तिजोरी लुटणाऱ्या दोघांना ठोकल्या बेड्या**

**शेंदुरजनाघाट पोलिसांची दोन ठिकाणी कारवाई**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – करवार बसथांब्याजवळून चोरट्या मार्गाने सुरू असलेली रेतीची मोठी तस्करी पोलिसांनी उधळून लावत दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये तब्बल ४० लाख बहात्तर हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सरकारी महसूल बुडवून पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या दोन तस्करांविरुद्ध थेट गुन्हे दाखल करत एका आरोपीला जागेवरच बेड्या ठोकल्या आहेत.

पोलिसांच्या या अचानक आणि आक्रमक कारवाईमुळे परिसरातील रेतीमाफियांचे धाबे पुरते दणाणले असून अवैध धंदेवाल्यांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे.

वरुड परिसरातील करवार बसथांबा भागात नद्यांमधून चोरलेली गौण खनिज रेती वाहनांमधून बाहेरगावी पळवली



जात असल्याची पक्की खबर पोलिसांना मिळाली होती. या गुप्त माहितीच्या आधारे शेंदुरजनाघाट पोलीस ठाण्याचे हवालदार विरेंद्र अमृतकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह या मार्गावर सापळा रचला. तीन सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास संशयास्पद वेगाने जाणारे वाहन पोलिसांनी करवार थांब्यावर अडवले. गाडीची कसून झडती घेतली असता आतमध्ये कोणतीही अधिकृत पावती अथवा परवाना नसताना चार ब्रास चोरटी रेती भरलेली आढळून आली. पोलिसांनी घटनास्थळावरून आरोपी महेंद्र शंकर मरसकोल्हे, रा. पिंपळागड याला जागीच ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता महसूल विभागाची फसवणूक करून हा गोरखधंदा चालवला जात असल्याचे उघड झाले. पोलिसांनी तातडीने कारवाई करत वीस लाख रुपयांचे वाहन आणि बत्तीस हजार रुपयांची चार ब्रास रेती असा एकूण वीस लाख बत्तीस हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या पहिल्या धडकेनंतर काही वेळातच त्याच दिवशी सायंकाळच्या सुमारास याच करवार बसथांबा परिसरात पोलिसांनी दुसरी धाड टाकली. ताज नगर वरुड येथील अश्पाक अली पठाण हा आपल्या ताब्यातील वाहनातून अवैध रेती भरून वेगाने पसार होण्याच्या तयारीत होता. दबा धरून बसलेल्या पोलीस पथकाने गाडी थांबवून तपासणी केली असता त्यात बेकायदेशीरपणे उपसा केलेली गौण खनिज रेती आढळली. पोलिसांनी वीस लाखांचे वाहन आणि चाळीस हजार रुपयांची रेती असा एकूण वीस लाख चाळीस हजार रुपयांचा मुद्देमाल तात्काळ जप्त केला. एकाच दिवशी लागोपाठ केलेल्या या दोन्ही कारवायांमध्ये शेंदुरजनाघाट पोलिसांनी दोन वाहनांसह एकूण चाळीस लाख बहात्तर हजार रुपयांचा ऐवज ताब्यात घेतला आहे. शासकीय तिजोरी लुटून पर्यावरणाचा सत्यानाश करणाऱ्या या दोन्ही तस्करांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), पर्यावरण संरक्षण कायदा आणि जमीन महसूल अधिनियमातील कडक तरतुदींनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. करवार थांब्यावर पोलिसांनी चढवलेल्या या जोरदार हल्ल्यामुळे स्थानिक रेती तस्करांचे कंबरडे मोडले असून पुढील तपास पोलीस वेगाने करत आहेत.

# पुण्यात दहीहंडी उत्सवात पहिला गुन्हा दाखल, नियमांचे उलंघन करून डीजे वाजवणं भोवलं, साऊंड सिस्टिमही जप्त

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – राज्यभरात आज ढाक्कुमाकुम, ढाक्कुमाकुम.. करत गोविंदांचा उत्साह शिगेला पोहचल्याचे बघायला मिळत आहे.

तर दुसरीकडे राज्यातील सोलापूर, नवी मुंबई, पनवेल, परभणी,




संभाजीनगर, नागपूर, धुळे शहरांमध्ये डीजेला ब्रेक लावण्यात आलाय.

अशातच गेल्या काही दिवसांपासून याच डीजे आणि ध्वनी प्रदूषणाचा मुद्दा प्रचंड गाजत असताना आणि पोलिसांकडून डीजेबाबत निर्बंध लादण्यात आले असताना पुण्यात दहीहंडी उत्सवात पहिला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ८ बेस आणि ८ टॉप स्पीकर लावून ध्वनी प्रदुषण केल्याप्रकरणी बिबवेवाडी येथील दहीहंडी मंडळावर हा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.




# संपादकीय

**आयुष्यात ध्येय असावे, कारण ध्येयाशिवाय केलेल्या प्रवासाला काहीच अर्थ नसतो.**

## शर्वरी हाडके हत्याकांड : एका मुलीच्या मृत्यूपलीकडचा समाजाचा आरसा

अमरावतीतील शर्वरी हाडके हत्याकांडाने संपूर्ण विदर्भासह महाराष्ट्राला हादरवून सोडले. एका तरुणीच्या निर्घृण हत्येची बातमी समोर आल्यानंतर समाजात संतापाची लाट उसळली, रस्त्यावर आंदोलन झाले, दोषींना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी जोर धरू लागली. या घटनेने केवळ एका कुटुंबाचा संसार उद्ध्वस्त केला नाही, तर आपल्या समाजाच्या संवेदनशीलतेची, महिलांच्या सुरक्षिततेची आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वासाचीही कसोटी लागली आहे. अशा घटना घडतात तेव्हा समाजात भावना उफाळून येणे स्वाभाविक असते. मात्र, संतापाच्या पलीकडे जाऊन या घटनेतून आपण काय शिकणार आहोत, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. प्रत्येक वेळी एखाद्या मुलीचा बळी गेल्यानंतर काही दिवस चर्चा होते, आंदोलन होते, कठोर शिक्षेच्या घोषणा होतात आणि काही काळानंतर समाज पुन्हा आपल्या नेहमीच्या गतीने पुढे निघून जातो. हीच सवय सर्वाधिक धोकादायक आहे. शर्वरी हाडके प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केली असून तपास सुरू आहे. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे आणि कायद्याने दोष सिद्ध झाल्यानंतरच अंतिम निष्कर्ष निघतील. परंतु या प्रकरणाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे महिलांविरुद्धच्या गंभीर गुन्ह्यांबाबत समाजाची अस्वस्थता वाढत आहे. ही अस्वस्थता केवळ भावनिक न राहता ती व्यवस्थात्मक बदलांची मागणी करणारी असली पाहिजे. आजही अनेक मुली घरातून बाहेर पडताना कुटुंबाची चिंता वाढते. शिक्षण, नोकरी, प्रवास किंवा सार्वजनिक ठिकाणी वावरताना सुरक्षिततेची हमी मिळावी, ही फार मोठी अपेक्षा नाही. संविधानाने प्रत्येक नागरिकाला सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगण्याचा अधिकार दिला आहे. मात्र, प्रत्यक्षात हा अधिकार अनेक महिलांसाठी अजूनही अपूर्ण वाटतो. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न फक्त पोलिसांचा नाही, तर संपूर्ण समाजाचा आहे. अनेकदा सुरुवातीच्या छेडछाड, धमक्या, पाठलाग किंवा मानसिक त्रासाच्या घटनांकडे दुर्लक्ष केले जाते. 'हे काही मोठं नाही' किंवा 'वेळ जाऊ दे, सगळं ठीक होईल' अशी मानसिकता पुढे गंभीर गुन्ह्यांना खतपाणी घालते. प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावी असतील, तर अनेक घटना घडण्यापूर्वीच थांबू शकतात. या घटनेनंतर नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना आणि सामान्य नागरिकांनी आवाज उठवला. लोकशाहीत नागरिकांचा जागरूक सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. मात्र, आंदोलनासोबतच संस्थात्मक सुधारणांची मागणीही तितकीच आवश्यक आहे. केवळ कठोर शिक्षा पुरेशी नसते; तपास जलद, निष्पक्ष आणि पुराव्यांवर आधारित असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. पोलिस यंत्रणेवर अशा प्रकरणांमध्ये मोठी जबाबदारी असते. वैज्ञानिक तपास, डिजिटल पुरावे, फॉरेन्सिक तंत्रज्ञान आणि वेळेवर कारवाई यामुळे न्यायप्रक्रिया अधिक मजबूत होऊ शकते. त्याचबरोबर पीडित कुटुंबाशी संवेदनशील संवाद राखणेही तितकेच आवश्यक आहे. न्याय फक्त मिळाला पाहिजे असे नाही, तर तो मिळाल्याचे समाजाला दिसलेही पाहिजे. या प्रकरणाने सोशल मीडियाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. एखादी घटना घडल्यानंतर अफवा, अप्रमाणित माहिती आणि भावनिक पोस्ट्स मोठ्या प्रमाणात पसरतात. त्यामुळे तपासावर परिणाम होऊ शकतो आणि समाजात अनावश्यक तणाव निर्माण होतो. जबाबदार नागरिक म्हणून अधिकृत माहितीवर विश्वास ठेवणे आणि अप्रमाणित दावे पुढे न पाठवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

# कर्तृत्व, मेहनत, जिद्द आणि माणुसकीचा सुंदर संगम : शैलेश देशमुख

**कर्तृत्वाची उंची, मेहनतीची साथ, जिद्दीची ताकद, सकारात्मक विचारसरणी आणि माणुसकीची ऊब यांचा सुंदर संगम म्हणजे शैलेश देशमुख. वरुड शहरातील एक होतकरु, उत्साही आणि युवा व्यवसायिक म्हणून त्यांनी आपल्या कार्यातून, स्वभावातून आणि व्यक्तिमत्त्वातून समाजात स्वतःची एक वेगळी आणि विश्वासार्ह ओळख निर्माण केली आहे. तरुण वयात मोठी स्वप्ने पाहणे सोपे असते; परंतु त्या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी सातत्याने मेहनत करणे, अडचणींवर मात करणे, अपयशातून शिकणे आणि प्रत्येक नव्या संधीचे सोन्यात रूपांतर करणे यासाठी जिद्द, संयम आणि आत्मविश्वासाची गरज असते. हेच गुण शैलेशदादांच्या व्यक्तिमत्त्वातून प्रकर्षाने जाणवतात.**



तरुणाईमध्ये असलेली ऊर्जा, काहीतरी नवीन करण्याची धडपड, नवीन संधीचा शोध घेण्याची वृत्ती आणि प्रत्येक कामाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची त्यांची शैली निश्चितच प्रेरणादायी आहे. परिस्थिती कोणतीही असो, त्यातून मार्ग काढत पुढे जाण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या कर्तृत्वाची खरी ओळख आहे. व्यवसायाच्या क्षेत्रात यश मिळवण्यासाठी केवळ पैसा, भांडवल किंवा संधी पुरेशा नसतात. त्यासाठी सातत्यपूर्ण मेहनत, योग्य नियोजन, प्रामाणिकपणा, वेळेचे भान, निर्णयक्षमता आणि माणसांशी जपलेले नाते या सर्व गोष्टींची आवश्यकता असते. या गुणांना आपल्या कार्यपद्धतीत स्थान देत शैलेशदादांनी आपल्या व्यवसायिक प्रवासात एक विश्वासार्ह आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व म्हणून स्थान निर्माण केले आहे. आजच्या स्पर्धात्मक आणि वेगाने बदलणाऱ्या युगात स्वतःच्या कर्तृत्वावर उभे राहून व्यवसाय आणि उद्योगक्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणे ही निश्चितच अभिमानाची आणि कौतुकाची बाब आहे. आपल्या ध्येयावर विश्वास ठेवून, प्रत्येक आव्हानाला संधी मानून आणि सातत्याने पुढे जाण्याची त्यांची जिद्द ही त्यांच्या यशामागची खरी ताकद आहे. शैलेशयांचा उत्साही स्वभाव, मनमिळाऊ व्यक्तिमत्व, नवीन गोष्टी शिकण्याची तयारी, सकारात्मक विचार, ध्येयाकडे वाटचाल करण्याची जिद्द आणि प्रत्येक व्यक्तीशी आपुलकीने वागण्याची वृत्ती ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची विशेष वैशिष्ट्ये आहेत. मोठे होत असताना माणुसकी जपणे आणि यश मिळवत असताना आपल्या माणसांना सोबत घेऊन पुढे जाणे, हीच त्यांच्या व्यक्तिमत्वाची खरी श्रीमंती आहे.

वरुड शहराशी असलेली त्यांची नाळ, आपल्या माणसांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव ही देखील त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जमेची बाजू आहे. स्वतःच्या प्रगतीसोबतच आपल्या शहराची, आपल्या समाजाची आणि आपल्या माणसांचीही प्रगती व्हावी, अशी भावना मनात ठेवून वाटचाल करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. युवा पिढीसाठी शैलेशदादा हे निश्चितच एक प्रेरणादायी उदाहरण आहेत. परिस्थितीची कारणे सांगत बसण्यापेक्षा परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करावा, स्वप्ने केवळ पाहू नयेत तर ती पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम करावेत आणि यश मिळाल्यानंतरही जमिनीशी जोडलेले राहावे, हा संदेश त्यांच्या प्रवासातून मिळतो. प्रत्येक यशामागे अनेक दिवसांची मेहनत, अनेक रात्रींची धडपड, असंख्य अडचणी आणि न थांबणारी जिद्द दडलेली असते. त्यामुळे आजचा हा वाढदिवस केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून, आतापर्यंतच्या कर्तृत्वाचा गौरव करण्याचा आणि भविष्यातील नव्या संकल्पांना सुरुवात करण्याचा एक सुंदर क्षण आहे. आयुष्याच्या या नव्या पर्वात शैलेशदादांच्या सर्व स्वप्नांना नवी भरारी मिळो. त्यांच्या व्यवसायाचा दिवसेंदिवस विस्तार होवो, नवीन संधींची दारे खुली होवोत, प्रत्येक प्रयत्नाला यश लाभो आणि त्यांच्या कर्तृत्वाची कीर्ती अधिकाधिक उंचावत जावो. त्यांच्या आयुष्यात यश, समृद्धी, आनंद, समाधान, उत्तम आरोग्य आणि सुख-शांती सदैव नांदो.

जीवनातील प्रत्येक नवीन दिवस नवी ऊर्जा घेऊन येवो, प्रत्येक आव्हानावर मात करण्याचे बळ मिळो आणि त्यांच्या प्रत्येक ध्येयाला यशाची सुंदर किनार लाभो, हीच मनःपूर्वक सदिच्छा. व्यवसायाच्या क्षेत्रात त्यांनी गाठलेली प्रत्येक उंची आणखी उंचावत जावो.

त्यांच्या प्रयत्नांना यशाची साथ लाभो, त्यांच्या मेहनतीला योग्य फळ मिळो आणि त्यांच्या हातून भविष्यातही समाजाच्या हितासाठी, गरजूंच्या मदतीसाठी आणि वरुड शहराच्या विकासासाठी अनेक उत्तमोत्तम कार्य घडत राहो, अशी ईश्वरचरणी मनःपूर्वक प्रार्थना. ईश्वर त्यांना दीर्घायुष्य देवो, निरोगी आणि आनंदी आयुष्य देवो. त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य सदैव असेच खुललेले राहो, त्यांच्या आयुष्यात सुख-समाधानाची बरसात होत राहो आणि त्यांच्या प्रत्येक पावलावर यश, कीर्ती आणि प्रगतीची फुले उमलत राहोत.



गजानन घ्यार
वरुड
९८६०६०५३९३

# काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले, पण शिक्षकच खरा मार्गदर्शक

५ सप्टेंबर... डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस. देशाने तो शिक्षक दिन म्हणून साजरा करायला सुरुवात केली. एका महान शिक्षकाचा सन्मान म्हणून हा दिवस, पण खरा अर्थाने हा दिवस प्रत्येक त्या व्यक्तीचा आहे ज्याने आपल्याला अक्षर ओळखायला शिकवले, जगायला शिकवले. पूर्वी गुरु म्हणजे साक्षात परब्रम्ह होते. गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णू म्हणत आपण त्यांना देवाच्या जागी बसवले. छडी लागे छमछम, विद्या येई घमघम हा काळ होता. शिक्षकांबद्दल मनात प्रचंड आदर आणि थोडी भीतीही होती. शिक्षकांनी सांगितलेला शब्द म्हणजे अंतिम सत्य असायचे. आज चित्र बदलले आहे. ब्लॅक बोर्डची जागा स्मार्ट बोर्डने घेतली आहे. पुस्तकांची जागा गुगलने घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या हातात मोबाईल आहे, जगातले सगळे ज्ञान एका क्लिकवर उपलब्ध आहे. अशा वेळी प्रश्न पडतो, शिक्षकांची गरज आजही तेवढीच आहे का? याचे उत्तर होय असेच आहे, किंबहुना आज गरज अधिक वाढली आहे. गुगल तुम्हाला माहिती देईल, पण माहितीचे ज्ञानात आणि ज्ञानाचे संस्कारात रूपांतर फक्त शिक्षकच करू शकतो. इंटरनेट तुम्हाला उत्तर देईल, पण योग्य प्रश्न कसा विचारायचा हे शिक्षकच शिकवतो. आज जेव्हा नात्यांमध्ये दुरावा येतोय, मूल्यांची घसरण होतेय, नैराश्य वाढतेय, तेव्हा विद्यार्थ्याला फक्त शिकवणारा नाही तर समजून घेणारा, त्याच्या पाठीवर हात ठेवणारा शिक्षक हवा आहे.



ग्रामीण भागातील शिक्षकांचे काम तर अधिक कठीण आहे. कमी सुविधा, शेतकरी कुटुंबातील मुले, अनेकदा पहिली पिढी शिकणारी. अशा मुलांना फक्त अभ्यासक्रम नाही तर जगण्याची उमेद द्यावी लागते. मी अनेक शिक्षक पाहिले आहेत जे स्वतःच्या पगारातून गरीब मुलांना वह्या-पुस्तके घेतात, घरी जाऊन पालकांना समजावतात की पोराला शिकु द्या. हीच खरी गुरुदक्षिणा आहे. आजचा शिक्षक हा फक्त शिकवणारा राहिला नाही, तो मार्गदर्शक, समुपदेशक, मित्र आणि कधी कधी पालकही झाला आहे. कोरोना काळात आपण पाहिले, शाळा बंद होत्या पण शिक्षण थांबले नाही. शिक्षकांनी स्वतःच्या मोबाईलवरून, झाडाखाली, गावाच्या पारावर जाऊन मुलांना शिकवले. तंत्रज्ञान आत्मसात करुन ऑनलाइन क्लास घेतले. हे समर्पण इतर कोणत्याही व्यवसायात दिसणार नाही. मात्र दुसरी बाजूही आहे. आज शिक्षकांवरील अवास्तव कामाचा बोजा वाढला आहे. निवडणूक ड्युटी, जनगणना, शालेय पोषण आहाराच्या नोंदी, शंभर प्रकारचे ॲपवरचे रिपोर्ट. या प्रशासकीय कामात तो खरा शिक्षक हरवतोय का? याचाही विचार समाजाने करायला हवा. शिक्षकाला पुन्हा वर्गात मोकळा श्वास घेऊ द्यायला हवा. डॉ.राधाकृष्णन म्हणायचे, 'शिक्षक हा मेणबत्तीसारखा असतो, जो स्वतः जळून दुसऱ्यांना प्रकाश देतो.' आजच्या पिढीला या प्रकाशाची सर्वात जास्त गरज आहे. या शिक्षक दिनी आपण फक्त व्हॉट्सॲपवर शुभेच्छा देऊन थांबू नये. ज्या शिक्षकाने आपल्याला घडवले, त्याला प्रत्यक्ष भेटूया, त्यांचे आशीर्वाद घेऊया. आणि आजचे शिक्षक म्हणून, विद्यार्थ्यांच्या मनात पुस्तकांपेक्षा मोठे स्थान निर्माण करुया. कारण इमारतीच्या पायात जसे सिमेंट असते, तसेच देशाच्या पायात शिक्षक असतो. पाया मजबूत असेल तरच इमारत टिकत



शेषराव नर्मदा गोपाळ कडू
मो.नं.९९२३९८८७३४

# चीनच्या ह्युमनॉइड रोबोट क्रांतीचे वास्तव

मोठ्या संख्येने रोबोट तयार करण्यामागे चीनचा केवळ उत्पादन विक्रीचा हेतू नसू शकतो. अधिक रोबोट म्हणजे अधिक प्रयोग; अधिक प्रयोग म्हणजे अधिक डेटा; अधिक डेटा म्हणजे अधिक सक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता.



माणसासारखा दिसणारा, दोन पायांवर चालणारा, हातांनी वस्तू उचलणारा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने निर्णय घेणारा रोबोट पाहिला की भविष्यातील जग आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. कारखान्यात काम करणारे रोबोट, घरातील कामे करणारे रोबोट, वृद्धांना मदत करणारे यंत्रमानव आणि माणसाच्या नोकऱ्या हिरावून घेणारी यंत्रे - या सगळ्या कल्पना आता विज्ञानकथेपुरत्या राहिलेल्या नाहीत. विशेषतः चीनने ह्युमनॉइड रोबोटच्या क्षेत्रात घेतलेली झेप जगाचे लक्ष वेधून घेत आहे. मात्र, माणसासारखा दिसणारा रोबोट माणसासारखा विचारही करू शकतो का? उत्तर सध्या तरी नाही असे स्पष्ट आहे.

चीनमध्ये ह्युमनॉइड रोबोटस क्षेत्रात १५०हून अधिक कंपन्या कार्यरत आहेत. २०२५ मध्ये जगभरात सुमारे २० हजार ह्युमनॉइड रोबोट पाठवले गेले. त्यापैकी तब्बल ९५ टक्के चीनमध्ये तयार झाले. २०२६ मध्ये चीन एक लाखांहून अधिक ह्युमनॉइड रोबोट तयार करण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. आकडे मोठे आहेत; पण प्रत्यक्ष वापर आणि व्यावसायिक व्यवहार्यता याबाबतचे चित्र मात्र तेवढे आश्वासक नाही. यातून चीनच्या महत्त्वाकांक्षेचे कौतुक करायचे की या तंत्रज्ञानामागील आर्थिक फुगवट्याबद्दल सावध व्हायचे, हा प्रश्न उभा राहतो. ह्युमनॉइड रोबोटचे प्रात्यक्षिक पाहताना सर्वप्रथम लक्ष वेधले जाते ते त्याच्या हालचालींकडे. रोबोट नाचतो, धावतो, बॉक्सिंग करतो, कुंग फूच्या हालचाली करतो किंवा अवघड कसरती करतो. सोशल मीडियावर अशा व्हिडिओंना मोठी लोकप्रियता मिळते. मात्र उद्योगासाठी या कौशल्यांचे महत्त्व मर्यादित आहे. कारखान्याच्या व्यवस्थापकाला रोबोट नाचतो की नाही यापेक्षा तो दिवसभर एकच काम सातत्याने, अचूकतेने आणि कमी खर्चात करू शकतो का, हा प्रश्न महत्त्वाचा असतो. याच ठिकाणी ह्युमनॉइड रोबोटची खरी परीक्षा सुरू होते.


चीनमधील प्रशिक्षण केंद्रात शंभरहून अधिक रोबोट्सना खोकी वर्गीकृत करणे, नूडल्सचे पॅकेजिंग करणे किंवा कॉफी बनविणे यांसारखी साधी कामे शिकवावी लागत आहेत. माणसासाठी सहज असलेली कृती मशीनसाठी किती गुंतागुंतीची आहे, हे यातून दिसते. टेबलवरचा ग्लास उचलताना किती दाब द्यायचा? तो ग्लास अपेक्षेपेक्षा जड असेल तर पकड कशी बदलायची? समोरचा माणूस अचानक बाजूला झाला तर शरीराचा तोल कसा सांभाळायचा? जमिनीवर एखादी वस्तू पडली तर तिच्यावर पाय न ठेवता मार्ग कसा बदलायचा? माणूस ही कामे विचार करून नव्हे, तर अनुभवातून जवळपास सहज करतो. रोबोटला मात्र प्रत्येक हालचालीमागे डेटा, सेन्सर आणि संगणकीय प्रक्रिया लागते. यंत्राला चालता येणे सोपे होत आहे; पण परिस्थिती समजून घेणे अजूनही कठीण आहे. रोबोटिक्समधील खरी लढाई शेवटच्या दहा सेंटीमीटरची, शेवटच्या एका सेंटीमीटरची आणि अखेरीस शेवटच्या एका मिलिमीटरची आहे. माणसाची हुबेहुब नक्कल करणे आणि माणसाच्या क्षमतेची पुनरावृत्ती करणे या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# सोनिया गांधी यांचे आत्मचरित्र 'हार्परकॉलिन्स'मार्फत

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

***नवी दिल्ली*** – काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या बहुप्रतीक्षित 'बिलाँगिंग : अ जर्नी ऑफ लव्ह' या आत्मचरित्राच्या भारतातील प्रकाशनाबाबत असलेला संभ्रम अखेर दूर झाला आहे. 'पेंग्विन रँडम हाऊस इंडिया'सोबत झालेल्या वादामुळे निर्माण झालेली कोंडी फुटली असून, आता 'हार्परकॉलिन्स इंडिया' हे पुस्तक १० नोव्हेंबर रोजी भारतामध्ये प्रकाशित करणार आहे.




हार्परकॉलिन्स इंडियाने शुक्रवारी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आजच्या काळातील अत्यंत उत्सुकता असलेल्या राजकीय आत्मचरित्रांपैकी हे एक आहे. 'बिलाँगिंग' ही प्रेम, ओळख, कर्तव्य आणि आपुलकीची एक नाट्यमय तसेच अत्यंत वैयक्तिक कहाणी असून, त्यातून भारताच्या प्रवासाचा दुर्मिळ अंतर्गत दृष्टिकोन पाहायला मिळतो.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या इटलीतील व्हेनेटो येथील बालपणापासून केंब्रिजमधील प्रवासाचा यात उल्लेख आहे, जेथे १९६५ मध्ये त्यांची भेट राजीव गांधी यांच्याशी झाली. राजीव गांधी यांच्याशी विवाह, माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भेट आणि भारतात आल्यानंतर हिंदी शिकणे, साडी नेसणे व भारतीय संस्कृतीशी जुळवून घेणे याचा प्रवास यात मांडला आहे.

# चांगल्या शाळांची मागणी सरकारविरोधी कशी? सीजेपीचे अभिजीत दीपके यांचा सवाल

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

***नाशिक*** – चांगल्या शाळांची मागणी करणे किंवा शाळांची स्थिती सुधारण्याचा आग्रह धरणे हा सरकारविरोधी नरेटिव्ह कसा काय ठरू शकतो, असा सवाल 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजित दीपके यांनी केला आहे. तसेच परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'आश्रमशाळां'ना भेट देऊन 'रियॅलिटी चेक' करावा, असे आवाहनही त्यांनी केले.



नाशिक येथील ईदगाह मैदानावर आंदोलन करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांची गुरुवारी भेट घेतल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

आदिवासी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा, अन्न आणि शिक्षण यातील तफावत पूर्णपणे अमान्य आणि असह्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दर्जेदार अन्न आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेशी संबंधित विविध मागण्यांसाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतील १०० हून अधिक आदिवासी विद्यार्थी ईदगाह मैदानावर आंदोलन करत असून, तीन विद्यार्थी बेमुदत उपोषणावर बसले आहेत.

'बी' टीम कोणाची आंदोलक विद्यार्थ्यांनी आश्रमशाळांमधील स्वच्छतागृहांची दुरवस्था, आरोग्याचे प्रश्न आणि शैक्षणिक सुविधांचा अभाव यांकडे दीपके यांचे लक्ष वेधले.

आंदोलकांच्या मागण्या राज्यातील आश्रमशाळांमध्ये ५९२ विद्यार्थ्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याचा दावा करत त्यांच्या कुटुंबांना भरपाई द्यावी व जबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित करावे, आश्रमशाळांमधील सुरक्षा आणि विद्यार्थ्यांच्या मृत्यूंविषयी जबाबदारी स्वीकारून आदिवासी विकासमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, सेंट्रल किचन व्यवस्थेऐवजी वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना ताजे अन्न शिजवून दिले जावे, देणगीच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून होणारी कथित वसुली थांबवावी, आदिवासी क्रीडा प्रबोधिनीतील भ्रष्टाचाराच्या तपासासाठी सामाजिक संस्थांचा समावेश असलेली समिती स्थापन करावी, प्रत्येक आश्रमशाळेतील विद्यार्थ्याला १० लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यात यावे, या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

# महाराष्ट्राच्या उपराजधानीत डीजे बंदी झुगारली

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

## नागपूरमध्ये डीजेच्या दणदणाटात लेझरसह दहीहंडी उत्सव सुरु

***नागपूर*** – पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी डीजेवर १ नोव्हेंबरपर्यंत बंदी घातली होती. मात्र, हे आदेश धुडकावत नागपूरमध्ये डीजेचा दणदणाट सुरु असल्याचं समोर आलं आहे. दहीहंडी उत्सव नागपूरमध्ये सुरु आहे. पोलिसांच्या सूचनेनंतर ही आ वाजवत आणि लाइट्सचा वापर करत दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदाकडून थर रचणे सुरू झाले आहे. नागपूरच्या बडकस चौकात 'बडकस चौक मित्र परिवार' तर्फे आयोजित



दहीहंडीला सुरुवात झाली आहे. बडकस चौकात पोलीस ही उपस्थित आहेत मात्र पोलीस आवाजाच्या मर्यादेवर लक्ष ठेवून आहेत.

आवाज कमी मात्र डीजेचा दणदणाट नागपूरच्या बडकस चौकातील बडकस चौक मित्र परिवारानं सकाळपासून डीजे लावणार अशी भूमिका घेतली होती. संध्याकाळी दहीहंडीचा उत्सव सुरु झाला तेव्हा डीजे सुरु करण्यात आला आहे. डीजे लावण्यात आला असून आवाज नेहमीसारखा नाही. मात्र, काही अंशी कमी असला तरी डीजेचा दणदणाट सुरु आहे. तीव्र प्रकाशाच्या लाईटसचा वापर करण्यात आलेला आहे. बडकस चौकात गोविंदा पथकं थर रचून सहभाग नोंदवत आहेत. पोलीस देखील बडकस चौकात असून ते आवाज नोंदवत आहेत. सात वाजताच्या सुमारास आवाज ८० ते ८२ डेसिबल आवाजाची नोंद झाली आहे. पोलीस याबाबत काय कारवाई करतात याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## प्रसिध्द अस्थिरोग तज्ञ डॉ.निलेश झोटिंग यांचे मार्गदर्शनाखाली

# रविवारी बोन मास डेन्सिटोमेट्री व न्यूरोपॅथी तपासणी

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येत्या ६ सप्टेंबर रोजी शहरातील जायंट्स चौक परिसरातील गुरुकृपा ऑर्थो अँड ॲक्सिडेंट हॉस्पिटल येथे अत्याधुनिक संगणकीकृत मशीनद्वारे बोन मास डेन्सिटोमेट्री व न्यूरोपॅथी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



सकाळी १० ते दुपारी ३ दरम्यान होणाऱ्या या शिबिरामध्ये कं बरदुखी, पाठदुखी, गुडघेदुखी, फ्रॅक्चरचा त्रास, संधिवात, हातापायांमध्ये मुंग्या येणे किंवा थरथर कापणे अशा तक्रारी असलेल्या नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

साधारणपणे १३ ते १७ हजार रुपयांपर्यंत होणारी हाडांतील कॅल्शियम तपासणी या शिबिरात पूर्णपणे मोफत केली



"हाडे मजबूत ठेवण्यासाठी आज केलेली तपासणी ही भविष्यातील फ्रॅक्चर आणि गंभीर त्रास टाळण्यासाठी महत्त्वाची ठरू शकते. त्यामुळे नागरिकांनी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.निलेश झोटिंग यांनी केले आहे.

जाणार आहे.

चहा-कॉफीचे अतिसेवन, धूम्रपान किंवा मद्यपानाची सवय, पूर्वी हाड मोडल्याचा इतिहास किंवा दीर्घकाळ पाठदुखीचा त्रास असलेल्या व्यक्तींनी विशेषतः ही तपासणी करून घ्यावी, हे शिबिर प्रसिध्द अस्थिरोग तज्ञ डॉ. निलेश आर. झोटिंग यांचे मार्गदर्शनाखाली होणार असून प्रथम १०० रुग्णांना प्राधान्य दिले जाणार आहे. नोंदणीसाठी ९९७०५७०५६० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

# नालसा मेगा ड्राईव्हच्या माध्यमातून सेमाडोह येथे १३ नालसा योजनांची प्रभावी अंमलबजावणी

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या (नालसा) मेगा ड्राईव्ह अंतर्गत चिखलदरा तालुक्याच्या सेमाडोह गावातील नागरिकांच्या दारापर्यंत विधी सेवा, कायदेविषयक मार्गदर्शन व विविध शासकीय योजना अशा एकूण १३ नालसा योजनांचा लाभ पोहचविण्यात येत आहे. ग्रामस्थांमध्ये या उपक्रमाबाबत उत्साह




असून, त्यांच्या दारापर्यंत विधी सेवा आणि शासनाच्या योजनांची माहिती व लाभ पोहोचत असल्याने ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहेत.

नालसाच्या निर्देशानुसार देशभरातील नागरिकांना त्यांच्या दारापर्यंत विधी सेवा, कायदेविषयक मार्गदर्शन तसेच विविध शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्रासह १८ राज्यांमध्ये नालसा मेगा ड्राईव्ह-१ हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. राज्यातील निवडक जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येत असून महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाद्वारे या उपक्रमासाठी अमरावती जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. जिल्ह्यातील दुर्गम व सामाजिक-आर्थिकदृष्ट्या गरजू भागाचा विचार करून चिखलदरा तालुक्यातील सेमाडोह गावाची निवड करण्यात आली आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष उज्वला नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांच्या समन्वयातून २५ ऑगस्ट २०२६ पासून मेगा ड्राईव्हची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. हा मेगा ड्राईव्ह २३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत चालणार आहे. सेमाडोह येथे नालसा मेगा ड्राईव्ह टप्पा १ अंतर्गत १३ नालसा योजनांची तळागाळात प्रभावी अंमलबजावणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावतीचे सचिव, कार्यालयीन कर्मचारी तसेच पॅरा-लीगल स्वयंसेवक सेमाडोह गावास वारंवार भेटी देऊन नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत आहेत.

# रघुवीर घाटात दरड कोसळली : एसटी बस घाटातच अडकली, १५ ते २० गावांचा संपर्क तुटला

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

***रत्नागिरी*** – रघुवीर घाटात गुरुवारी (दि.३) रात्री मोठी दरड कोसळल्याने सातारा-रत्नागिरी मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. दरड कोसळलेल्या ठिकाणी अकलपे-खेड एसटी बस अडकली असून, सातारा जिल्ह्यातील १५ ते २० गावांचा रत्नागिरीशी संपर्क विस्कळीत झाला आहे. रस्ता बंद झाल्याने प्रवाशांचे हाल दरड कोसळल्याने रस्त्यावर मोठ्या आकाराचे दगड, शिळा आणि मातीचा ढिगारा तयार झाला आहे. त्यामुळे वाहनांना पुढे जाणे शक्य नसून मागून येणारी वाहतूकही थांबली आहे. शाळा, महाविद्यालय, आरोग्यसेवा तसेच बाजारपेठेसाठी खेडकडे येणाऱ्या घाटमाथ्यावरील नागरिकांनाही याचा फटका बसला आहे.

## स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुल ढगा येथे

# पर्यावरणपूरक राखी निर्मिती स्पर्धा उत्साहात संपन्न

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – कलाजीवन बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुल, ढगा येथे रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक राखी निर्मिती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सण उत्सव साजरे करत असताना पर्यावरणाचे संवर्धन व्हावे आणि विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलतेसोबतच पर्यावरणाप्रती जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.




या स्पर्धेत गुरुकुलातील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी कागद, कापूस, ताग, लोकरी, कडधान्य, बी-बियाणे, नैसर्गिक फुले-पाने आणि नैसर्गिक रंगांचा वापर करुन आकर्षक आणि पर्यावरणपूरक राख्या तयार केल्या. प्लास्टिकचा वापर टाळून तयार केलेल्या या राख्या सर्वांचे आकर्षण ठरल्या. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी 'सण साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणे हीच खरी मानवता' असा संदेश दिला. याप्रसंगी गुरुकुलाचे प्राचार्य व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक केले. पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर करुन सण साजरे केल्यास प्रदूषण टाळता येईल आणि निसर्गाचे रक्षण होईल, असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. स्पर्धेतील उत्कृष्ट राखी निर्मिती करणाऱ्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात येणार असून, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीसोबतच पर्यावरण संवर्धनाचे संस्कार रुजण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कलाजीवन बहुउद्देशीय संस्थेचे पदाधिकारी, गुरुकुलाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'राष्ट्रनिर्मिती व आदर्श समाज मधील दुवा म्हणजे शिक्षक' - प्राचार्य डॉ.दिगंबर कापसे : 'समर्थ महाविद्यालयात शिक्षक दिनाचे आयोजन'

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

***अमरावती*** – समर्थ महाविद्यालय लाखनी येथे डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्ताने शिक्षक दिनाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

व्यासपीठावर प्राचार्य डॉ.दिगंबर कापसे,वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.सुनंदा रामटेके, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. मनीषा मदनकर प्रा.कॅप्टन बाळकृष्ण रामटेके, प्रा.सुरेश केदार राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ.बंडू चौधरी उपस्थित होते. कोणत्याही देशाच्या व समाजाच्या




जडणघडणीत सिंहाचा वाटा शिक्षकांचा असतो शिक्षक हे नवीन पिढी घडवीत असतात. शिक्षकांच्या माध्यमातून शास्त्रज्ञ, वैज्ञानिक, साहित्यिक, संशोधक, कलावंत, राजकारणी, समाज सुधारक, उद्योगपती, आदर्श नागरिक घडवण्याचे कार्य होते.

त्यामुळे राष्ट्र उभारणी व आदर्श समाज निर्मितीच्या मध्ये शिक्षकाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते म्हणून शिक्षकांच्या सन्मान होणे म्हणजे राष्ट्रनिर्मिती व आदर्श समाज निर्मितीच्या करिता सर्वस्व पणाला लावणाऱ्या कर्तुत्वाचा सन्मान ठरतो. असे प्रतिपादन शिक्षक दिनाच्या निमित्ताने प्राचार्य डॉ.दिगंबर कापसे यांनी केले.

शिक्षक दिनाच्या निमित्ताने'आपले विद्यार्थी आपले वक्ते' च्या माध्यमातून कुमारी फरहत शेख, कुमारी शेजल शेंडे, कुमारी वैभवी सपाटे, प्रेषित गडकरी यांनी शिक्षक दिनाच्या निमित्ताने उपस्थित पुढे मनोगत व्यक्त केली याप्रसंगी सर्व शिक्षकांना पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो प्रमुख डॉ.बंडू चौधरी यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कमरजहा शेख व आभार प्रदर्शन श्रेयस चौधरी यांनी केले.

कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता प्रा.लालचंद मेश्राम, प्रा.युवराज जांभुळकर प्रा. कांबळे डॉ.संगीता हाडगे, रितेश झलके व इतर प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# पावसाची हुलकावणी : बळीराजाच्या डोळ्यात पाणी; विदर्भात तब्बल ५८ टक्के पावसाची तूट

## संत्र्यासह धान पिकांना मोठा फटका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नागपूर** – विदर्भाच्या दृष्टीने संपूर्ण आगस्ट महिना हा दुष्काळी महिना ठरला आहे. एकट्या आगस्ट महिण्यात विदर्भात पावसाची तूट हि ५८ टक्के नोंदविली गेली. संत्रा पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागपूर जिल्ह्यत हि तूट ७१ टक्के व अमरावती जिल्यात ८२ टक्के आहे. त्याचा परिणाम संत्रा पिकावर पडला आहे. मुबलक पाऊस न झाल्यामुळे संत्र्याची मोठ्या प्रमाणात गळ सुरु झाली आहे. मागच्या दोन आठवड्या २५ ते ३० टक्के झाडावरचा बहर गळून पडला आहे. भविष्यत पाऊस आला नाही तर हि गळ ८० टक्क्यांपर्यंत जाण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. त्यातच एक महिण्यापासून असलेले सलगचे ढगाळ वातावरण त्यामुळे संत्रा पिकाला बुरशीजन्य रोगाची लागण झाल्याने हि गळ वेगाने होत आहे.

**दुष्काळी आगस्ट महिना; विदर्भात तब्बल ५८ टक्के पावसाची तूट**

या वर्षीचा आगस्ट महिना अक्षरशः दुष्कळी महिना ठरला आहे. परिणामी त्याचा परिणाम पिकांवर आणि जलसाठ्यावर झाल्याचे दिसून येतंय. १ ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत विदर्भात केवळ १२५.५ मिमी पाऊस नोंदविण्यात आला. या कालावधीत विदर्भाची सरासरी पर्जन्यमानाची अपेक्षा २९७.१ मिमी होती. त्यामुळे ऑगस्टमध्ये विदर्भात तब्बल ५८ टक्के पावसाची तूट नोंदविण्यात आली आहे. ऑगस्टमधील पावसाची सर्वाधिक तूट अकोला जिल्ह्यात ८४ टक्के असून, तेथे केवळ ३३.५ मिमी पाऊस झालाय. अमरावतीत ४६.४ मिमी पावसासह ८२ टक्के, तर यवतमाळमध्ये ५४.१ मिमी पावसासह ७८ टक्के तूट राहिलीय.

**ऑगस्टमध्ये पावसाची कमतरता : केवळ ८३.६ मिमी पाऊस**

नागपूर जिल्ह्यातही ऑगस्टमध्ये पावसाची मोठी कमतरता राहिली. जिल्ह्यात केवळ ८३.६ मिमी पाऊस झाला असून, सरासरी २८६.४ मिमीच्या तुलनेत ७१ टक्के तूट नोंदविण्यात आली. वर्धा जिल्ह्यात ६५.५ मिमी पाऊस झाला असून तूट ७३ टक्के, तर वाशिममध्ये ६२.६ मिमी पावसासह ७१ टक्के तूट राहिली आहे. चंद्रपूरमध्ये १५९ मिमी पाऊस झाला असून तूट ५५ टक्के, बुलढाण्यात ७६.१ मिमी पावसासह ६१ टक्के, तर भंडाऱ्यात २०७ मिमी पाऊस झाला असून तूट ४३ टक्के आहे. तुलनेने गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांत ऑगस्टमधील पावसाची स्थिती काहीशी चांगली राहिली. गडचिरोलीत २९३.६ मिमी पाऊस झाला असून तूट ३२ टक्के, तर गोंदियात २९५ मिमी पाऊस झाला असून तूट २८ टक्के आहे.

# कंत्राटदारांच्या आत्महत्यांनी संघटना आक्रमक : राज्यभरात सोमवारी निषेध आंदोलन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्य सरकारच्या विविध विभागांतील विकास कामे मार्गी लावल्यानंतर देयकाची रक्कम मिळवण्यासाठी कंत्राटदारांना मंत्रालयाच्या पायऱ्या झिझवाव्या लागत आहेत. मात्र देयकापोटी ८६ हजार कोटी देण्याकडे राज्य सरकार दुर्लक्ष करत असल्याने कंत्राटदार आत्महत्या करत आहेत. नवी मुंबई येथे राहणारे गजानन देवकते (३७), तर जिल्हा लातूर येथे राहणारे दयानंद हुल्ले (५५) यांनी आत्महत्या केल्याचे प्रकरण ताजेच आहे. मात्र राज्य सरकार देयकाची रक्कम देण्याची चालढकल करत राज्य सरकारचा निषेध करण्यासाठी सोमवार ७ सप्टेंबर रोजी राज्यभरात निषेध आंदोलन करण्याचा इशारा कंत्राटदार महासंघाने दिला आहे. याबाबत सातत्याने महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना यांनी धरणे आंदोलन, मोर्चा, निषेध? आंदोलन करीत आहेत, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व संबंधित विभागाचे मंत्री, अधिकारी यांना भरपूर वेळा निवेदन दिले.

# दहीहंडी कार्यक्रमानंतर मोठी दुर्घटना : लोखंडी सांगाडा कोसळून ४५ वर्षीय महिलेचा मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – दहीहंडीचा उत्सव संपल्यानंतर लोखंडी संरचना उतरवताना झालेल्या दुर्घटनेत ४५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे. पुण्यातील जुन्या सांगवी परिसरात शुक्रवारी (दि.०४) रात्री ही घटना घडली. विघ्नहर्ता मंडळाच्या दहीहंडी कार्यक्रमानंतर लोखंडी सांगाडा काढण्याचं काम सुरू असताना त्याचा जड भाग अचानक खाली कोसळला. या दुर्घटनेत सलमा सलाउद्दीन पठाण (४५) गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आलं; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. सांगाडा उतरवताना घडली दुर्घटना पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दहीहंडीचा कार्यक्रम संपल्यानंतर शुक्रवारी रात्री तात्पुरती उभारलेली लोखंडी संरचना उतरवण्याचं काम सुरू होतं. याचवेळी संरचनेचा एक अवजड भाग अचानक खाली पडून सलमा पठाण यांच्या डोक्यावर आदळला. या धडकेत त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.

# मंत्रालयात शिक्षणमंत्र्यांच्या अधिकाराला कात्री, अवर सचिव स्तरावरच निर्णय : मंत्री दादा भुसेंची पहिली प्रतिक्रिया

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यात विनाअनुदानित शाळांची संख्या मोठ्या प्रमाणावर होत असून इंग्रजी माध्यमांच्या शाळा वाढत आहेत. वाढते नागरिकीकरण आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता, शाळांच्या संख्येतही वाढ होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर स्वयंअर्थसहायित शाळांसाठीचे अधिकार आता मंत्री महोदयांच्या स्तरावर न ठेवता सचिवांकडे देण्यात आले आहेत. राज्य सरकारच्या प्रशासकीय कारभारात सुधारणा आणि गतिमानता आणण्याकरिता शालेय शिक्षण खात्याशी संबंधित मंत्र्यांच्या महत्त्वाच्या अधिकारांना कात्री लावण्यात आल्याची बातमी समोर येते आहे. मात्र, कामांची गर्दी होऊ नये, कामात सुटसुटीत पणा यावा म्हणून मी स्वतः हा निर्णय निर्णय घेतला असल्याची प्रतिक्रिया शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिली. शिक्षणमंत्र्यांच्या अधिकाराला कात्री लावण्यात आल्याची माहिती समोर आली असून महत्त्वाचे निर्णय आता अधिकारी स्तरावर देण्यात आले आहेत. मात्र, यासंदर्भात माहिती देताना हा निर्णय माझा स्वतःचा असल्याचे मंत्री दादा भुसेंनी म्हटले. कामांची गर्दी होऊ नये, कामामध्ये सुटसुटीतपणा यावा म्हणूनच हा निर्णय घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये अतिरिक्त तुकड्यांना, शाखांना मान्यता देण्याचे, सीबीएसई, आयसीएसई सारख्या विविध मंडळांच्या अभ्यासक्रमांना ना–हरकत प्रमाणपत्र देण्याचे तसेच नव्या तुकड्या व शाखांना मान्यता देण्यासारखे महत्त्वाचे अधिकार विभागाचे सचिव आणि शिक्षण आयुक्तांकडे सोपविण्यात आल्याचा निर्णय मी स्वतः घेतला आहे, असे मंत्री दादा भुसेंनी माध्यमांशी बोलताना सांगितले. कोल्हापुरात शिक्षकांचा मोर्चा दरम्यान, आज देशभरात शिक्षक दिन साजरा होत असून शिक्षक दिनीच कोल्हापुरात हजारो शिक्षक रस्त्यावर उतरून एल्गार करत असल्याचं पाहायला मिळालं.

# रस्ते, घरकुल, आरोग्य, पाणी पुरवठ्याच्या समस्या सोडवाव्यात

## खासदार बळवंत वानखडे यांचे निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अमरावती** – केंद्र शासनाच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध योजनांच्या माध्यमातून निधी देण्यात येतो. या निधीचा योग्य विनियोग करून ग्रामीण जनतेचे जीवन सुकर करावे. यात प्रामुख्याने पांदण रस्ते, घरकुल, आरोग्य यासोबतच पाणी पुरवठ्याच्या समस्या सोडविण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश खासदार बळवंत वानखडे यांनी दिले.

जिल्हा नियोजन भवनात वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची सभा पार पडली. यावेळी खासदार डॉ.अनिल बोंडे, आमदार प्रविण पोटे, गजानन लवटे, प्रविण तायडे, अशासकीय सदस्य मोरेश्वर वानखडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त डॉ.मंगेश गोंदवले, उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख आदी उपस्थित होते.

जिल्ह्यात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यात प्रामुख्याने रस्त्यांचा विकास होणे आवश्यक आहे. चांगल्या रस्त्यांमुळे जिल्ह्यात पायाभूत सुविधा निर्माण होण्यास मदत मिळणार आहे. जिल्ह्यातील काही मार्गाची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने या कामांना गती देण्यात यावी. रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्याला प्राधान्य देण्यात यावे. त्यासोबतच शेतकऱ्यांसाठी पांदण रस्ते महत्वाचे आहेत. यासाठी पांदण रस्त्यांवर लक्ष केंद्रीत करण्यात यावे. यातील अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा, अशा सूचना खासदार वानखडे यांनी केल्या.

गरजूंना आर्थिक सहाय्याच्या योजना महत्वाच्या आहेत. प्रामुख्याने दिव्यांगांना देण्यात येणारी मदत थांबविण्यात येऊ नये. आवश्यकता भासल्यास तालुकास्तरावर शिबीरे घेऊन यूडीआयडी प्रमाणपत्र वाटप करण्यात यावे. यासाठी आवश्यक त्या सुविधा उभारण्यात याव्यात. ग्रामीण भागातील घरकुलांचा प्रश्न महत्वाचा आहे. घरकुल मंजूर झाल्यानंतर संबंधितास पाच ब्रास रेतीचे वाटप करण्यासाठी पास देण्यात यावा. तसेच जवळपास असलेल्या रेतीच्या उपलब्धतेबाबत माहिती देण्यात यावी. तसेच टप्पेनिहाय अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी यंत्रणांनी प्रयत्न करावेत.

आरोग्य ही महत्वाची बाब असून यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. रूग्णवाहिकांना इंधनाचा नियमित पुरवठा होईल, याची दक्षता घेण्यात यावी. मेळघाटात आरोग्याचे प्रश्न असल्याने याठिकाणी रूग्णवाहिका उपलब्ध राहिल, याची दक्षता घेण्यात यावी. आरोग्यासोबतच पाणी पुरवठा महत्वाचे आहे. जलजीवन मिशनमधून पूर्ण करण्यात येणारी कामे तातडीने पूर्ण करावीत. गावात प्रत्यक्ष पाणी पुरवठा सुरू होईल, यासाठी कामे तातडीने पूर्ण करावीत. यामुळे साथीच्या आजारावर नियंत्रण मिळिवणे शक्य होईल.

युवकांसाठी रोजगार मेळावे आयोजित करण्यात यावे. येत्या २९ सप्टेंबर रोजी तालुकास्तरावर रोजगार मेळावे आयोजित करण्यात येत आहे. यासाठी नियोजन करण्यात यावे. त्यांना प्रशिक्षण आणि बँकांकडून कर्ज मंजूर होण्यासाठी प्रयत्न करावेत. हे उद्योग कायमस्वरूपी सुरू राहावेत, यासाठी प्रयत्न करावेत. कंत्राटी तत्वावर कार्यरत कामगारांना पूर्ण वेतन मिळावे, यासाठी कामगार विभागाने जागृती करावी. क्रिडा क्षेत्रात उत्कृष्ट खेळाडू घडावेत, यासाठी विद्यापीठाचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना खासदार वानखडे यांनी केल्या.

# ५ ऑक्टोबरपर्यंत विशेष मोहीम, नियमबाह्य रिक्षा रडारवर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – नियमबाह्य पद्धतीने रस्त्यावर धावणाऱ्या स्क्रॅप रिक्षा प्रवाशांच्या सुरक्षेसाठी गंभीर धोका बनल्या आहेत. अशा रिक्षांमधून प्रवासी वाहतूक होताना त्या कोणत्याही परिस्थितीत रस्त्यावर दिसता कामा नयेत. स्क्रॅप रिक्षांविरोधात ५ ऑक्टोबरपर्यंत विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोटार वाहन परिवहन विभागाला दिले आहेत. स्क्रॅप झालेल्या किंवा नियमबाह्य रिक्षांचा प्रवासी वाहतुकीसाठी वापर होत असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत परिवहन मंत्री सरनाईक यांनी शुक्रवारी विशेष बैठक घेतली. परिवहन आयुक्त कार्यालयात झालेल्या या बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, रिक्षा–टॅक्सी युनियनचे नेते शशांक राव तसेच राज्यभरातील रिक्षा संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# नागरिकांच्या समस्या निवारणासाठी दररोज वेळ राखीव अभ्यागतांसाठी दुपारी 3 ते ५ वाजेपर्यंत भेटी अनिवार्य

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – जिल्ह्यातील सर्व शासकीय व महसूल विभागाच्या कार्यालय प्रमुखांनी नागरिकांच्या अडचणी व तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी दररोज दुपारी ३ ते ५ या वेळेत अभ्यागतांना भेटणे अनिवार्य करण्यात आले आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या निर्देशांनुसार निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी परिपत्रक जारी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुद्रांक जिल्हाधिकारी तसेच भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांनी दररोज दुपारी ३ ते ५ ही वेळ नागरिकांच्या भेटीसाठी राखीव ठेवणे आवश्यक आहे. राखीव वेळेत विभाग प्रमुखांनी शक्यतो स्वतः उपस्थित राहून नागरिकांची निवेदने, तक्रारी ऐकून त्यावर नियमानुसार योग्य ती कारवाई करावी लागणार आहे. ज्या प्रकरणांचे तात्काळ निवारण शक्य नाही, त्यांची नोंद घेऊन विहित कालमर्यादेत कार्यवाही करणे बंधनकारक राहील. अत्यावश्यक शासकीय बैठका किंवा अपरिहार्य प्रशासकीय कारणांमुळे विभाग प्रमुख उपस्थित राहू शकत नसल्यास, त्यांच्या जागी सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करून नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करावे. नागरिकांना विनाकारण ताटकळत राहावे लागू नये आणि कार्यालयीन कामकाज अधिक सुरळीत व परिणामकारक व्हावे, यासाठी या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७६९/२०२६** **ने.ता.१२/१०/२०२६**

**अर्जदार :-**

अफसर अली इरफान अली

वय अं.५९ वर्ष, धंदा–मजुरी

रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत इरफान अली युसुफ अली व मयत बिस्मील्लाबी इरफान अली, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१२/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# डीजेचे स्तोम संपलेले दिसेल : मुख्यमंत्र्यांचा दावा, लवकरच सरकार घेणार निर्णय

**‘कायद्याचा बडगा नको, लोकांना विश्वासात घ्यायला हवे’**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**पुणे** – ‘डीजे’च्या दणदणाटाने नागरिकांना भूकंप आल्यासारखा त्रास होत असून, अशा अनिष्ट प्रथांवर केवळ कायद्याचा बडगा न उगारता, लोकांना विश्वासात घेऊन आणि चर्चेतून मार्ग काढला पाहिजे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी व्यक्त केले.



पुण्याच्या पोलीस आयुक्तांनी सर्व गणेशोत्सव मंडळांशी आणि संबंधित घटकांशी सविस्तर चर्चा केली आहे आणि त्यात बऱ्याच गोष्टींवर सकारात्मक एकमत झाले आहे, असे नमूद करून ते म्हणाले की, डीजेचे जे काही स्तोम तयार झालेले आहे, ते लोकांच्या सहभागातूनच कमी झालेले किंवा संपताना दिसेल.

# उपोषण मागे घेण्यास मनोज जरांगेंचा नकार

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**जालना** – मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे–पाटील यांनी आपले उपोषण मागे घेण्यास स्पष्ट नकार दिला असून, ११ सप्टेंबरपर्यंत मागण्या मान्य न झाल्यास १२ सप्टेंबर रोजी मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. महाराष्ट्र सरकारचे मंत्री आणि आमदारांच्या शिष्टमंडळा सोबत झालेली चर्चा निष्फळ ठरल्यानंतर जरांगे यांनी मराठा समाजाला कुणबी जातीच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंतरवाली



सराटी येथे मनोज जरांगे गेल्या सात दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत, प्रसाद लाड आणि मकरंद पाटील यांच्या शिष्टमंडळाने जरांगे यांची भेट घेऊन चर्चा केली. मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे–पाटील यांनी आपले उपोषण मागे घेण्यास स्पष्ट नकार दिला असून, ११ सप्टेंबरपर्यंत मागण्या मान्य न झाल्यास १२ सप्टेंबर रोजी मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

**सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून**

# शेतकऱ्याची विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून तालुक्यातील जामगाव (खडका) येथे ५२ वर्षीय शेतकऱ्याने स्वतःच्या शेतातच विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या केल्याची घटना काल (ता.३) सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली.



नितीन अरुण केचे असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव असून नितीन यांच्याकडे एकूण १२ एकर शेती होती परंतु गेल्या अनेक वर्षांपासून सततची नापिकी आणि कर्जाबाजारीपणामुळे ते सतत चिंतेत राहत होते. काल दुपारच्या सुमारास ते शेतात गेले आणि त्याच ठिकाणी त्यांनी विषारी औषध प्राशन केले. आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या निदर्शनास ही बाब येताच त्यांनी तातडीने त्यांना शेतातून वरुड येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले परंतु त्यांची प्राणज्योत मालवली.

अत्यंत सुस्वभावी आणि कष्टाळु वृत्तीचे असलेले नितीन केचे यांच्या अचानक निधनाने गावांमध्ये शोककळा पसरली असून त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगा आणि मुलगी असा आप्तपरिवार आहे.

बेनोडा (शहीद) पोलिसांनी घटनास्थळ गाठुन पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदना करीता ग्रामीण रुग्णालय वरुड येथे पाठविला होता. आज सकाळच्या सुमारास जामगाव येथे त्यांच्या पार्थिवावर स्वकीय, आप्तेष्ट आणि नातेवाईकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.





